तरूण भारत

# डॉ. यशवंत थोरात यांच्या पुस्तकांचे २५ रोजी प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'नाबार्ड' चे माजी अध्यक्ष डॉ.यशवंत थोरात यांच्या 'काही वाटा काही वळण' आणि 'नवी वाट नवी क्षितीजे' या पुस्तकांचे शनिवारी दसरा चौकातील शाहू स्मारक येथे प्रकाशन होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आणि श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा होणार आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून विविध विषयावर केलेले भाष्य वाचकांच्या पसंदीला पडेल असा विश्वास डॉ. यशवंत थोरात यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

पुस्तक प्रकाशन सोहळयाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.डी. टी.शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, अस्मिता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. डॉ. थोरात यांच्या आजवरच्या त्यांच्या वाटचालीतील विविध अनुभव, घटना, प्रसंगांची सुरेख गुंफण करत विविध सदरासाठी लेखन केले आहे. अशा लेखांचा संग्रह असलेली ही पुस्तके आहेत. शालेय, महाविद्यालयीन शिक्षण, वडिल लेफ्टनंट एसपीपी थोरात, ब्रम्हविद्येचे अभ्यासक व गुरु अच्युतराव पटवर्धन यांच्याबरोबरच्या आठवणी आणि पुढे प्रशासकीय सेवेत आल्यावर भेटलेली विविध माणसे, जगभरातील प्रवासादरम्यानचे अनुभव मांडण्यात आले असून ते आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतील असा विश्वास डॉ. थोरात यांनी व्यक्त केला.

डॉ.थोरात म्हणाले, तरुण वाचकांना माझ्या लेखनातून आशादायी भविष्य दिसेल. मध्यवयीनांना मांडलेली मूल्ये आपली वाटतील.तर समवयस्कांना स्मरणरंजन होईल. सामाजिक, राजकीय, शेती, अर्थव्यवस्था, धर्मनिरपेक्षता, तत्वज्ञान अशा विविध विषयावर केलेले भाष्य वाचकांना आवडेल. यावेळी डॉ. उषा थोरात, शंकर मांगलेकर, रमाकांत भिंगार्डे उपस्थित होते.

24 FEB 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. यशवंतराव थोरात यांच्या पुस्तकांचे उद्या प्रकाशन



कोल्हापूर, ता. २३ : 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांच्या 'काही वाटा काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितिज' या पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी (ता. २५) होणार आहे. दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनात सायंकाळी साडेपाचला कार्यक्रम होईल. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे, तर श्रीमंत शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी असतील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, अनुबंध प्रकाशन संस्थेच्या अस्मिता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल.

पुण्याच्या अनुबंध प्रकाशन संस्थेने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. डॉ. थोरात यांनी आजवरच्या त्यांच्या वाटचालीतील विविध अनुभव, घटना-प्रसंगांची सुरेख गुंफण करत 'सकाळ'च्या सप्तरंग पुरवणीतील सदरांसाठी लेखन केले. अशाच लेखांचा संग्रह असलेली ही पुस्तके आहेत. शालेय-महाविद्यालयीन शिक्षण, वडील लेफ्टनंट जनरल एसपीपी थोरात, ब्रह्मविद्येचे अभ्यासक व गुरू अच्युतराव पटवर्धन यांच्याबरोबरच्या काही आठवणी आणि पुढे प्रशासकीय सेवेत आल्यानंतर त्यांना भेटलेली विविध माणसं, जगभरातील प्रवासादरम्यानचे अनुभव त्यांनी लेखनातून मांडले आहेत.

डॉ. थोरात सांगतात, "मी सांगितलेल्या या कथा खऱ्या आहेत का? असं मला कधी कधी विचारलं जातं. माझं उत्तर आहे, 'हो आणि नाही'. तपशील तंतोतंत खरे नसतील. पण, त्या गोष्टीमधला आशय खरा आहे. तरुण वाचकांना माझ्या लेखनात आशादायी भविष्य दिसेल. मध्यमवयीन ज्यांना मी मांडत असलेली मूल्यं आपली वाटतील. काही माझ्या पिढीतील आहेत. त्यांना माझ्या गोष्टींमधून स्मरणरंजन होईल. विविध विषयांवर केलेलं हे भाष्य वाचकांना नक्कीच आवडेल."

पुढारी

# डॉ. यशवंत थोरात यांच्या पुस्तकांचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या 'काही वाटा काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितिज' या पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी (दि. २५) होणार आहे. दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी साडेपाच वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होईल.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, अनुबंध प्रकाशन संस्थेच्या अस्मिता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. डॉ. थोरात यांनी त्यांच्या वाटचालीतील विविध अनुभव, घटना-प्रसंगांची सुरेख गुंफण करत विविध सदरांसाठी लेखन केले आहे. अशाच लेखांचा संग्रह असलेली ही पुस्तके आहेत.

पुण्यनगरी

# थोरात यांच्या पुस्तकांचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या 'काही वाटा काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितिज' या पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी (ता.२५) शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते, तर श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, अनुबंध प्रकाशन संस्थेच्या अस्मिता कुलकर्णी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

पुण्याच्या अनुबंध प्रकाशन संस्थेने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. डॉ. थोरात यांनी आजवरच्या त्यांच्या वाटचालीतील विविध अनुभव, घटना-प्रसंगांची सुरेख गुंफण करत विविध सदरांसाठी लेखन केले. अशाच लेखांचा संग्रह असलेली ही पुस्तके आहेत. शालेय, महाविद्यालयीन शिक्षण, वडील लेफ्टनंट जनरल एसपीपी थोरात, ब्रह्मविद्येचे अभ्यासक व गुरू अच्युतराव पटवर्धन यांच्याबरोबरच्या काही आठवणी आणि पुढे प्रशासकीय सेवेत आल्यानंतर त्यांना भेटलेली विविध माणसं, जगभरातील प्रवासादरम्यानचे अनुभव आपल्या लेखनातून सांगतानाच डॉ. थोरात यांनी प्रत्येक लेखातून आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतील, असे विचार आवर्जून नोंदवले आहेत.

पुढारी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, डॉ.ए.एम.गुरव, डॉ. रामचंद्र पोवार आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात संत गाडगेबाबा जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ.ए.एम.गुरव, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पोवार, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. केदार मारूलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. रामदास बोलके, डॉ.टी.सी.घोडके, डॉ. दीपाली पाटील, डॉ. जयश्री लोखंडे, सचिन चौगुले, समीर गावडे उपस्थित होते. दरम्यान, संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध अधिविभागांसह प्रशासकीय विभागांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

पुण्यनगरी

# विद्यापीठात संत गाडगेबाबा जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पोवार, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक शिवलिंगप्पा सपली, केदार मारूलकर, दीपा इंगवले, रामदास बोलके, टी. सी. घोडके, दीपाली पाटील, जयश्री लोखंडे, सचिन चौगुले, समीर गावडे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, आज संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध अधिविभागांसह प्रशासकीय विभागांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या १९ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १९ परीक्षांचे निकाल गुरुवारी जाहीर करण्यात आले. आतापर्यंत एकूण ६९ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी दिली. दरम्यान, दिवसभरात परीक्षा केंद्रावरून सांगलीतून एक आणि कोल्हापुरातून तीन असे चार गैरप्रकार भरारी पथकाकडून उघड झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२२च्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी सुरळीतपणे पार पडल्या. दिवसभरात बॅचलर ऑफ जर्नलिझम, मास्टर ऑफ जर्नलिझम, एमए, एमबीए, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन एज्युकेशन, सर्टिफिकेट कोर्स इन रशियन लँग्वेज, डिप्लोमा इन रशियन लँग्वेज अशा एकूण १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये आणि अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

पुढारी

# आज उद्योजक, संशोधकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे उद्योजक व संशोधकांसाठी शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी 'व्यवस्थापन विकास कार्यक्रम' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत नॅनो सायन्स आणि नॅनो तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील, सध्याच्या घडामोडी; नवनवीन संकल्पना आणि विकास; तसेच या तंत्रज्ञानाची भविष्यातली व्याप्ती या बाबींवर विचारमंथन होणार आहे. नॅनो तंत्रज्ञानाच्या साह्याने या तंत्रज्ञानाशी निगडीत व त्यावर आधारित कंपन्यांच्या विकासासाठी कसे प्रयत्न केले जाऊ शकतील यावर चर्चा होणार आहे. विविध विषयांवर त्या-त्या संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने व परिसंवाद होणार आहेत, अशी माहिती स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली आहे.